संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जनसंपर्क विभाग

---

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अधिसभा निवडणूक २०२२
## नोंदणीकृत पदवीधारकांना नाव नोंदणीबाबत सूचना

अमरावती : (३०.०६.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १३१ मधील तरतूदीनुसार उन्हाळी - २०२१ पर्यंत फक्त या विद्यापीठातील म्हणजेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर डॅशबोर्डवरील इलेक्शन पोर्टल २०२२ मध्ये दिलेल्या लिंकच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने तसेच महाराष्ट्र शासनाने एकरुप परिनियम क्र. २/२०१७ द्वारे विहित केलेल्या नमुना अर्जामध्ये दि. १ ते २० जुलै, २०२२ या कालावधीत मागविण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतांना दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावयाचे असून अर्जाची प्रिन्ट, आवश्यक दस्तावेजाच्या छायांकित प्रती आणि नोंदणी शुल्क रू. २०/- ऑनलाईनद्वारे अथवा ऑफलाईन (विद्यापीठाच्या काऊन्टरवर रोखीने भरुन) पैसे भरलेल्या पावतीचा एक भाग जोडून संबंधितांना शुक्रवार, दि. २२ जुलै, २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत विद्यापीठाच्या केंद्रीय आवक शाखेत जमा करावयाचे आहेत, याबाबत सर्व संबंधितांना नोंद घ्यावयाची आहे.

### आवश्यक दस्तावेज

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी पदवी प्रमाणपत्र, निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा) व पैसे भरल्याची पावती (पैसे ऑनलाईन भरले असल्यास आवश्यक नाही) आदी दस्तावेज जोडावयाचे आहेत.

### नोंदणीकृत पदवीधारकांसाठी आवश्यक सूचना

यापूर्वी ज्या पदवीधारकांची विद्यापीठाने तयार केलेल्या पंजीकृत पदवीधरांची व्हॉल्युम १, २, ३, ४, ५ व ६ मध्ये नोंदणी झाली असेल अशा पंजीकृत उमेदवारांनी पुन्हा नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नसून त्यांनी सदर व्हॉल्युममध्ये नाव असल्याची खात्री करुन घ्यावयाची आहे. सदर व्हॉल्युममध्ये नाव नसेल तरच नाव नोंदणी प्रक्रियेत सहभाग घ्यावा. कृषी विद्यापीठाच्या पदवीधरांनी तसेच इतर अकृषी विद्यापीठाच्या पदवीधारकांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी अर्ज करु नये. याशिवाय इतर विद्यापीठातून पदवी घेतलेले आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्यांनी सुद्धा नाव नोंदणीसाठी अर्ज करुन नये.

विहित मुदतीनंतर आलेले तसेच अपूर्ण अर्ज कोणत्याही परिस्थितीत विद्यापीठाकडून स्वीकारले जाणार नाहीत. तद्वतच यासंदर्भात संबंधित अर्जदारांसोबत कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी डॉ. तुषार देशमुख यांनी विद्यापीठाच्यावतीने कळविले आहे. अधिक माहितीसाठी उपकुलसचिव श्री प्रमोद तालन (९९२२९९३२७३) व सहा. कुलसचिव श्री आर.जे. सयाम (९४२३६४९३४६) यांचेशी संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ३०/०६/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 156

Win2PDF®

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/